# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-25.08.2026** **वार- मंगळवार**

---

**SIR**

विशेष सखोल पुनरीक्षणाच्या पहिल्या टप्प्यातील घरोघरी जाऊन केलेल्या सर्वेक्षणाचं  काम मुदतवाढीसह निर्धारित कालावधीत पूर्ण केल्याबद्दल पुणे विभागातील जिल्हाधिकारी आणि त्यांच्या पथकाचं मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी कौतुक केलं आहे. पुणे विभागातील एसआयआरच्या कामाचा आढावा घेण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. एसआयआरच्या पुढील टप्प्यातील प्रारुप मतदार यादी, हरकती-सुनावणी तसंच पुढील कार्यवाहीसाठी नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

**कळमळकर**

भारताला ११ हजार किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला असून, समुद्रातील संसाधनं, औषधी घटक, जैवविविधता आणि सुरक्षेच्या दृष्टीनं संशोधनाला मोठा वाव असल्याचं सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. नितीन कळमळकर यांनी सांगितलं. ते आज पुण्यात पत्रकार भवनातील पत्रकार परिषदेत समुद्र वैद्यकीय शिक्षण आणि योग पतंजली या विषयावर बोलत होते.

**बागायतदार अधिवेशन**

शेती आर्थिकदृष्ट्या अडचणीची ठरत असून, विविध प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणावर शेतजमिनी घेतल्या जात आहेत. त्यामुळे शेतकरी कुटुंबातील सर्वांनी शेतीवर अवलंबून न राहता, काही सदस्यांनी उद्योग-व्यवसायाकडे वळण्याचं आवाहन ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केलं. पुण्यातील मांजरी इथं महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाच्या ६६ व्या वार्षिक अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. सध्या शेतीखालील क्षेत्र आणि शेतीवरील अवलंबित्व कमी होत असल्याचं पवार यांनी नमूद केलं. महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघ ही प्रगत आणि चांगली संघटना असल्याचे गौरवोद्गार पवार यांनी यावेळी काढले.

**अतिक्रमण**

पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामं, अतिक्रमणं आणि अनधिकृत टपऱ्यांवर तातडीनं निष्कासनाची कारवाई करण्याच्या सूचना अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी दिल्या आहेत. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या सूचनेनुसार आयोजित आढावा बैठकीत महापालिकेच्या भूखंडांवरील अतिक्रमणे आणि पदपथ मोकळे करण्यास प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात आल्या. या कामात दिरंगाई किंवा हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी तसंच कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा सूर्यवंशी आणि सांडभोर यांनी दिला आहे.

**गॅसपुरवठा**

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील नैसर्गिक वायू पुरवठा अधिक सक्षम आणि सुरक्षित करण्यासाठी महाराष्ट्र नॅशनल गॅस लिमिटेड अर्थात एमएनजीएलने ६५ किलोमीटर लांबीच्या स्टील ट्रंक पाइपलाइन प्रकल्पाला सुरुवात केली आहे. या पाइपलाइनमुळे शहराला नैसर्गिक वायूचा अतिरिक्त आणि पर्यायी स्रोत उपलब्ध होणार असून, वाढत्या सीएनजी आणि पीएनजी ग्राहकांची मागणी पूर्ण करण्यास मदत होणार आहे. हा प्रकल्प जुलै २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

**तपासणी मोहीम**

पुणे विभागात अन्न आणि औषध प्रशासनानं शाळा परिसरातील जंक फूड विक्री विरोधात विशेष तपासणी मोहीम राबवून नियमांचं उल्लंघन करणाऱ्या २ आस्थापनां वर कारवाई केली आहे. तपासणी दरम्यान अस्वच्छता आणि अन्न सुरक्षा मानकांचं उल्लंघन आढळून आल्यानं एफडीएने ही कठोर कारवाई केली.विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई सुरूच राहील, असा इशारा प्रशासनानं दिला आहे.

**बांबूराखी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात मेळघाटातील आदिवासी महिलांच्या हस्तकलेला व्यासपीठ उपलब्ध करून देत 'सृष्टिबंध बांबू राखी महोत्सवा'चे उद्घाटन प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर यांच्या हस्ते आज करण्यात आलं. मेळघाटातील कोरकू आदिवासी महिलांनी तयार केलेल्या पर्यावरणपूरक बांबू राख्या तसच विविध वस्तू या प्रदर्शनात मांडण्यात आल्या आहेत. २८ ऑगस्ट पर्यंत हे प्रदर्शन नागरिकांसाठी विनामूल्य खुले आहे.

**क्रीडादिन**

राष्ट्रीय क्रीडा दिना निमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विद्यार्थ्यांशी आभासी संवाद कार्यक्रम येत्या २७ ऑगस्टला होणार आहे. माय भारत आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. पुण्यातील अजिंक्य डी.वाय.पाटील कॉलेज, टी.जे. कॉलेज, सिंबायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी आणि विश्वकर्मा युनिव्हर्सिटी या चार संस्थांमध्ये कार्यक्रम होणार असल्याची माहिती जिल्हा युवा अधिकारी आशिष शेटे यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. हॉकीचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो.

**बुद्धिबळस्पर्धा**

दरम्यान, राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त क्रीडा भारतीतर्फे ११ वी डॉ. हेडगेवार स्मृती खुली रॅपिड बुद्धिबळ स्पर्धा येत्या ३० ऑगस्टला पुण्यात आयोजित करण्यात आली आहे. बीएमसीसी महाविद्यालयाच्या टाटा हॉलमध्ये सकाळी नऊ वाजता स्पर्धेला सुरुवात होईल. प्रवेशाची अंतिम मुदत २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत आहे.

**आरोपशेट्टी**

देशात ४८ लाख टन साखरेचा ताळमेळ लागत नसल्याचा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष आणि माजी खासदार राजू शेट्टी यांनी आज पुण्यात केला. जुन्नर इथं आयोजित शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. साखरेच्या साठ्यातील तफावतीची चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी त्यांनी केली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान ३० तर किमान तापमान २२ पूर्णांक ३ अंश सेल्सिअस होतं. उद्याही थोड्या फार फरकाने असंच हवामान असण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**